**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सौदी अरेबियाच्या दोन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यासाठी रवाना

- अमेरिका आणि भारत या दोन्ही देशांदरम्यान द्विपक्षीय व्यापार कराराचा पहिला टप्पा पूर्ण होण्याची आशा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडून व्यक्त

- जागतिक वसुंधरा दिवस आज सर्वत्र साजरा

**आणि**

- विदर्भासह उत्तर भारतात अनेक राज्यांमध्ये पुढचे दोन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सौदी अरेबियाच्या दोन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यासाठी रवाना झाले. सौदी अरेबियाचे युवराज आणि प्रधानमंत्री मोहम्मद बिन सलमान यांच्या निमंत्रणावरून असलेला त्यांचा हा दौरा, दोन्ही देशांमधली वाढती धोरणात्मक भागीदारी प्रतिबिंबित करतो. सौदी अरेबिया बरोबरचे दीर्घकालीन ऐतिहासिक संबंध भारतासाठी मोलाचे असून अलीकडच्या काळात हे संबंध धोरणात्मक दृष्ट्या अधिक दृढ आणि गतिशील झाल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी प्रस्थानापूर्वी दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

दोन्ही देशांनी संरक्षण, व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा आणि जनतेमधील संवाद, यासह परस्पर हिताची ठोस भागीदारी विकसित केल्याचं त्यांनी म्हटलं आहे. प्रादेशिक शांतता, समृद्धी, सुरक्षा आणि स्थैर्य वाढवण्यासाठी दोन्ही देशांमध्ये सामायिक हितसंबंध आणि भागीदारी असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. प्रस्तावित

भारत-मध्यपूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉरचं धोरणात्मक महत्त्व देखील त्यांनी यावेळी अधोरेखित केलं. धोरणात्मक भागीदारी परिषदेच्या दुसऱ्या बैठकीत सहभागी होण्यासाठी आणि  युवराज मोहम्मद बिन सलमान यांच्या २०२३ मधल्या भारत भेटीचं यश वृद्धिंगत करण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी म्हटलं आहे.

प्रधानमंत्र्यांच्या या भेटीमुळे  दोन्ही देशांच्या नेतृत्वाला गाझा मधली परिस्थिती, इस्त्रायल-हमास संघर्षविरामाचे प्रयत्न, यासह प्रादेशिक घडामोडींवर चर्चा करण्याची संधी मिळेल. व्यापार, दळणवळण, ऊर्जा, सुरक्षा, गुंतवणूक, भारतीय समुदाय, संस्कृती आणि प्रादेशिक सहकार्य, हे मुद्दे चर्चेच्या केंद्रस्थानी असतील.

**<><><><><>**

अमेरिकेच्या नव्या प्रशासनाशी भारत सक्रीय संवाद साधत असून पुढील पाच ते सहा महिन्यात दोन्ही देशांदरम्यान द्वीपक्षीय व्यापार कराराचा पहिला टप्पा सकारात्मक दृष्टीने पूर्ण होईल, अशी आशा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन सध्या पाच दिवसांच्या अमेरिकेच्या दौऱ्यावर आहेत, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी द्विपक्षीय व्यापार करारासंदर्भात चर्चा सुरू करायला सहमती दर्शविली होती. मिशन ५००अंतर्गत उभय देशांतील व्यापार दुपटीपेक्षा जास्त करून तो ५०० अब्ज डॉलर्स पर्यंत पोहोचवण्याचे या कराराचे उद्दीष्ट आहे. या दौऱ्यात सीतारामान अमेरिकेचे अर्थ मंत्री स्कॉट बेसेंट यांची भेट घेणार आहेत. तसंच स्टॅनफोर्ड विद्यापीठात त्या बीजभाषण देणार आहेत आणि सॅन फ्रान्सिस्कोमधील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी गुंतवणूक आणि तांत्रिक प्रगतीवर चर्चा करणार आहेत. तसंच अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसीमध्ये, सीतारमन जागतिक नाणेनिधी

आणि जागतिक बँकेच्या बैठकांना तसंच जी २० देशांच्या अर्थमंत्री आणि केंद्रीय बँक गव्हर्नरच्या बैठकींना उपस्थित राहतील.

**<><><><><>**

‘एक राष्ट्र, एक निवडणूक’ या विषयावर संयुक्त संसदीय समितीची बैठक आता सुरु आहे.  एकोणचाळीस सदस्याच्या या बैठकीत लोकसभेतले सत्तावीस तर राज्यसभेतले बारा खासदार सहभागी झाले आहेत.

वारंवार होणाऱ्या निवडणूकांमुळे व्यवस्थेवर सतत तयारीचा ताण येतो. तसंच विद्यार्थी, शिक्षक आणि पर्यायाने शिक्षणपद्धतीवरसुद्धा ताण येतो. यामुळे एक देश एक निवडणूक ही संकल्पना राष्ट्रहिताची असल्याचं  संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष पी. पी. चौधरी यांनी बैठकीपूर्वी माध्यमांशी संवाद साधताना सांगितलं.

**<><><><><>**

अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स सध्या भारताच्या दौऱ्यावर असून आज त्यांनी जयपूर मध्ये आमेर किल्ल्याला आपल्या कुटुंबासह भेट दिली. राजस्थानचे मुख्यमंत्री भजनल शर्मा आणि उपमुख्यमंत्री दिया कुमारी यांनी त्यांचं स्वागत केलं. यावेळी राजस्थानची दिमाखदार लोकसंस्कृती प्रदर्शित करणारा कच्ची घोडी, घूमर आणि कालबेलिया या लोकनृत्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स आज दुपारी जयपूरमध्ये 'भारत-अमेरिका व्यापार सबंधांचं भविष्य' या विषयावरच्या व्यावसायिक परिषदेला संबोधित करतील.

**<><><><><>**

समाजातल्या शेवटी तळागाळातल्या व्यक्तीला आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक बळ मिळत नसेल, तर विकासाची स्वप्नं खऱ्या अर्थानं प्रत्यक्षात आली असं म्हणता येणार नाही, असं केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्री विरेंद्र कुमार यांनी म्हटलं आहे.  ‘सामाजिक न्याय पे चर्चा २०२५’ या कार्यक्रमात

ते बोलत होते.  प्रधानमंत्री मोदीं यांच्या नेतृत्वाखाली समाजातल्या वंचित घटकांसाठी अनेक योजना आखल्या जात आहेत, असं त्यांनी यावेळी नमूद केलं.

**<><><><><>**

पर्यावरण रक्षणाला पाठिंबा देण्यासाठी आज जागतिक वसुंधरा दिवस साजरा होत आहे. १९६९ साली युनेस्कोच्या शिखर परिषदेत झालेल्या ठरावानंतर १९७० मध्ये पहिला जागतिक वसुंधरा दिवस साजरा करण्यात आला. ‘आपली शक्ती, आपला ग्रह’, ही  यंदाच्या वसुंधरा दिनाची संकल्पना आहे.

पर्यावरणाशी संबंधित मुद्द्यांवर जागरूकता वाढवणं आणि पृथ्वीच्या रक्षणासाठी प्रत्यक्ष कृतीची प्रेरणा देणं, हे वसुंधरा दिनाचं उद्दिष्ट आहे. यंदाची संकल्पना शाश्वत ऊर्जेकडे वळण्याची तातडीची गरज अधोरेखित करते आणि व्यक्ती, समूह आणि सरकारांना २०३० सालापर्यंत स्वच्छ ऊर्जेची निर्मिती तिप्पट करण्याचं आवाहन करते. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी जीवाष्म इंधनावरचं अवलंबित्व कमी करणं, तसंच शाश्वत, समन्यायी आणि समावेशी ऊर्जा भविष्यासाठी गुंतवणूक करणं कसं महत्वाचं आहे, हे या मोहिमेतून अधोरेखित होतं.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशवासियांना वसुंधरा दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. पृथ्वी माता विकास आणि उत्क्रांतीची परिसंस्था जपण्यासाठी जीवसृष्टीचं संगोपन करत असून हे ऋण फेडण्यासाठी मानवानं पृथ्वी ग्रहाचं आरोग्य जपायला हवं, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

कोविडमुळे गेली ४ वर्षं स्थगित असलेली कैलास मानसरोवर यात्रा येत्या ३० जूनपासून पुन्हा सुरु होत आहे. यंदा यात्रेकरू उत्तराखंड मार्गानं  कैलास मानसरोवरसाठी रवाना होणार असून, उत्तराखंड सरकार आणि परराष्ट्र मंत्रालयाच्या देखरेखीखाली यात्रा आयोजित केली जाईल. कुमाऊं मंडळ विकास निगम कडे यात्रेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

ही यात्रा यंदा दिल्लीपासून सुरू होईल आणि पिठोरागड जिल्ह्यातल्या लिपुलेख खिंडीतून यात्रेकरू चीन मध्ये प्रवेश करतील. एकूण २५० यात्रेकरू २२ दिवसांच्या या खडतर प्रवासात सहभागी होत आहेत. इंडो-तिबेट सीमा पोलिस दलाच्या सहाय्याने दिल्ली आणि पिठोरागडमध्ये गुंजी इथं यात्रेकरूंची वैद्यकीय तपासणी केली जाईल. कैलास मानसरोवर इथं जाणाऱ्या यात्रेकरूंना ५०च्या पाच तुकड्यांमध्ये विभागण्यात आलं असून, यात्रेकरूंचा पहिला गट १० जुलै रोजी चीनमध्ये प्रवेश करेल, तर शेवटचा गट २२ ऑगस्ट रोजी परत येईल.

**<><><><><>**

विदर्भ, राजस्थान, मध्य प्रदेश, हरियाणा, उत्तर प्रदेश, ओदिशा आणि छत्तीसगडमध्ये पुढले दोन दिवस उष्णतेची लाट राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. कोकण, मराठवाडा, गोवा, गुजरात, बिहार, झारखंड, केरळ, माहे, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल आणि रायलसीमा मध्ये आज उष्ण आणि दमट हवामान राहील, असा अंदाज आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयात तुरळक ठिकाणी आज मुसळधार ते अतीमुसळधार पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

दहशतवादी संघटनांशी संबध असल्याच्या आरोपावरुन पंजाब पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतलं आहे. ‘वारिस दे पंजाब टीम’ या नावाच्या व्हॉटसअप समूहावरचं त्यांचं संभाषण झाल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटकेत असलेल्या खासदार अमरितपाल सिंग यांच्या अटकेला विरोध आणि केंद्र सरकारातल्या काही नेत्यांवर हल्ले करुन अशांतता माजवण्यासंदर्भात या दोघांनी व्हॉटसअप समूहावर काही विधानं केली होती अशी माहिती पंजाब पोलिसांनी दिली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ सुपर जायंटस आणि दिल्ली कॅपिटल्स दरम्यान लखनऊ इथं सामना होणार आहे. संध्याकाळी साडे सात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

**<><><><><><>**

भारतीय ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीने चीनच्या झू जिनरवर विजय मिळवत बुद्धिबळ ग्रँड प्रिक्समध्ये आघाडी घेतली.

**//<><><><><><>//**